शपथेवर पुढील सरतपास श्री मोटघरे विधीज्ञ मार्फत अर्जदारातर्फे :—

१२. शपथपत्र नि.क्र.यु—६ मला दाखविले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर माझया सांगितल्याप्रमाणे खरा व बरोबर आहे. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल माहीती अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद, चंद्रपुर यांनी माझे मयत पती — रमेश खोटे यांच्या संदर्भात दि.१५.०३.२००८ रोजी दिलेल्या पत्राची मुळ प्रतीवरून पडताळणी केलेली प्रत दाखविली. त्यास नि.क्र.यु—९ देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल मुख्याधिकारी नगर परिषद, चंद्रपुर यांनी माझे मयत पती रमेश खोटे यांना दि.०२.०६.२००३ रोजी दिलेल्या आरोप पत्राची मुळ प्रतीवरून पडताळणी केलेली प्रत दाखविली. त्यास नि.क्र.यु—१० देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल माझे मयत पती रमेश खोटे यांनी मुख्याधिकारी नगर परिषद, चंद्रपुर ला दि.३१.०५.२००३ रोजी सेवा निवृत्ती मिळण्याबाबत दिलेल्या पत्राची मुळ प्रतीवरून पडताळणी केलेली प्रत दाखविली. त्यास नि.क्र.यु—११ देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल माझे मयत पती रमेश खोटे यांनी मुख्याधिकारी नगर परिषद, चंद्रपुर ला दि.२६.०६.२००३ रोजी सेवा निवृत्ती मिळण्याबाबत दिलेल्या पत्राची मुळ प्रतीवरून पडताळणी केलेली प्रत दाखविती. त्यास नि.क्र.यु—१२ देण्यात येते.

तोंडी विनंती वरून उर्वरित सरतपास करीता पुढील तारीख देण्यात येते.

माझे समक्ष

स्वाक्षरी/—

(श्रीमती रू.वि. मेटे)

न्यायाधीश

कामगार न्यायालय, चंद्रपुर

चंद्रपुर.

दि.११.०५.२०२२.